RCS No. 174/2020

**नियमित दिवाणी दावा क्र.१७४/२०२०**
**(समिंद्राबाई जाधव वि. गिताबाई बाबर)**
**निशाणी ३२४ खालील**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२१ अनिल विश्वनाथ बाबर यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता विलंब झाला असून सदर विलंब माफ होवून मिळणेकरीता दाखल केला आहे की. वादी यांचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.२१ हे दिनांक १२.०८.२०२१ रोजी मौजे सांगोले, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे मयत झाले आहेत. वादी यांना मयत प्रतिवादी यांच्या मयताचा मृत्युदाखला वेळेत उपलब्ध न झाल्याने मयत प्रतिवादी क्र.२१ यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीताचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाला आहे. वादी यांनी अर्ज दाखल करणेस जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.२१ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणेत येवून अर्ज मंजूर करणेत यावा अशी वादीने विनंती केली आहे.

२. इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन वादींच्या अर्जातील कथने मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास जाणुनबजून विलंब केला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर करणेत यावा.

३. वादी यांनी निशाणी ३२४ वरील अर्जाच्या पृष्ठ्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२१ अनिल विश्वनाथ बाबर यांचा मृत्युदाखला दाखल केला आहे. वादी यांनी मुळ दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.२१ हे दिनांक १२.०८.२०२१ रोजी मयत झाले असून प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिनांक १७.०२.२०२४ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीने केलेला विलंब द्रव्यदंडावर माफ करणे मला

न्यायोचीत वाटते. त्यामुळे न्याय हिताचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

वादी यांचा निशाणी ३२४ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादीस र.रु.३००/- (तीनेश मात्र) खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

PALLAVI MANSING SURYAWANSHI

Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2025.10.09 10:27:58 +0530

विटा.
दिनांकः- ०७/१०/२०२५

**(श्रीमती पी.एम.सुर्यवंशी)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.